2017 - 18

Babu Genu Shikshan Sanstha's

# Late Kishanrao Ramji Shinde College, Parbhani, Dist. Parbhani (MS)


## One Day National Level Inter-Disciplinary Seminar

**On**

"Problems of Women in India : Challenges and ...

Sponsored by
S.R.T.M. University, Nanded

09th March, 2017



Editor
Dr. Digambar B. Rode

ASSISTANT PROFESSOR
DEPT. OF Phy Edu.
SHINDE ... SHIRUR (A.)

Organized by
Department of Economics (P.G.),
Late Kishanrao Ramji Shinde College,
Parbhani, Dist. Parbhani (M.S.) India

# Problems of Women in India : Challenges and Solutions


- **Editor :** Dr. Digambar B. Rode

- **Publisher :** Late Kishanrao Ramji Shinde College,
  Parbhani, Dist. Parbhani (MS) India

- **Published by :**
  Jyotichandra Publication
  Latur, Dist. Latur (M.S.)

- **ISBN 978-93-85162-24-4**

- **Printing & Binding :**
  Jyotichandra Offset Printing & Binding,
  Latur, Dist. Latur (M.S.)

- **Typesetting :**
  Vikas Dhamale & Anant Kotiwale

- **Cover Page :**
  Vikas Dhamale

- **Edition :** 09th March,2017


ASSISTANT PROFESSOR
DEPT. ...
... SHIRUR (A.)

महत्वपूर्ण सूचना :

संबंधीत पुस्तकामध्ये समाविष्ठ असलेले शोधनिबंध हे त्या- त्या संबंधीत लेखकांचे असून यामध्ये व्यक्त असलेले विचार हे त्या-त्या लेखकांचे आहेत. सबंधीत शोधनिबंधामध्ये समाविष्ठ असलेल्या विचाराशी संपादक किंवा संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. म्हणून संबंधीत शोधनिबंध व त्यामध्ये समाविष्ठ विचारांना ते लेखक जबाबदार राहतील. - **संपादक**

| Sr. No | Title for Research Paper | Page No |
|---|---|---|
| 38 | महिला सबलीकरण आणि भारत<br>**डॉ. डी. एस. पटवारी** | 101 |
| 39 | महिलांचे सक्षमीकरण आणि महिलांचा राजकीय सहभाग<br>**डॉ. रजनी अनंतराव बोरोळे** | 104 |
| 40 | महिला सक्षमीकरण<br>**डॉ. सुरेखा सदाशिवराव शिंदे** | 107 |
| 41 | भारतीय समाजातील सामाजिक समस्या : हुंडा आणि हुंडाबळीची समस्या<br>**डॉ. एस. पी. घायाळ** | 110 |
| 42 | भटक्या जमातीतील महिला सबलीकरण<br>**सुनिता जगन्नाथराव कुकडे** | 113 |
| 43 | भारतीय महिला सबलीकरण तथा सक्षमीकरण:भ्रम आणि वास्तव<br>**डॉ.उर्मिला एम. धूत** | 116 |
| 44 | महिला विकास एक समग्र दृष्टिकोन<br>**अशोकराव नरसिंगराव चित्ते** | 119 |
| 45 | महाड मधील सामाजिक कार्यात महिलांचे योगदान - एक अभ्यास<br>**अपूर्वा अनिल देसाई** | 122 |
| 46 | भारतातील महिला समोरील समस्या : आव्हने व उपाय<br>**बी. आर. शिंदे** | 125 |
| 47 | थेरी गाथा : बौद्ध भिक्षुणींच्या जीवनानुभवाचे दुर्मिळ विचारधन<br>**विवेक सिद्धार्थ ढवळे, राष्ट्रपाल रघुनाथराव गायकवाड** | 127 |
| 48 | स्त्री भ्रुण हत्या :एक सामाजिक समस्या<br>**डॉ. संजय काळे** | 130 |
| 49 | मराठयांच्या स्वातंत्र्य संग्रामात महाराणी ताराबाईचे योगदान<br>**वनिता मधूकर गावडे** | 133 |
| 50 | जातीय दृष्टीकोणातून स्त्रीमुक्ती<br>**डॉ. विठ्ठल व्यंकटराव घुले** | 136 |
| 51 | वैदिक कालखंडातील स्त्री : ऐतिहासिक परामर्श<br>**एम.जी. महाके** | 141 |
| 52 | महिला सबलीकरणाच्या योजना<br>**डॉ. एस.टी.सामाले** | 145 |
| 53 | आदिवासी महिला आणि त्यांचे शिक्षण<br>**डॉ. मनोजकुमार सोमवंशी, डॉ. जयश्री शिंदे** | 149 |
| 54 | भारतीय स्त्रीयांच्या सामाजिक-आर्थिकस्थितीचा आढावा<br>**डॉ. बी. एस. सावके** | 151 |
| 55 | स्वराज्य संकल्पनेत राष्ट्रमाता जिजाऊ यांचे योगदान<br>**एम. एम. कदम** | 154 |
| 56 | हुंडाबळी एक ज्वलंत समस्या - कारणे आणि उपाय<br>**अर्चना भगवानराव काळे** | 156 |


ASSISTANT PROFESSOR
DEPT. OF Phy. Edu.
SHIRUR (A.)

# आदिवासी महिला आणि त्यांचे शिक्षण

डॉ. मनोजकुमार सोमवंशी
अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
शिवनेरी महाविद्यालय,
शिरुर आनंतपाळ, जि. लातूर

डॉ. जयश्री शिंदे
शिवनेरी महाविद्यालय,
शिरुर आनंतपाळ, जि. लातूर

53

आजच्या आधुनिक युगात शिक्षण ही काळाची गरज बनली आहे. समाजाचा घटक म्हणुन आदिवासींनाही शिक्षण घेण्यासाठी प्रोत्साहन दिले जाते. त्याकरीता शासनाकडुन विविध शैक्षणिक उपक्रम राबविले जातात. आदिवासींच्या विकासाकरीता महाराष्ट्र शासनाने आदिवासी विकास विभाग स्थापन केला आहे. या विभागामार्फत अनेक आदिवासींच्या कल्याणाकरीता योजना राबविल्या जातात. त्याचाच एक भाग म्हणुन आदिवासी आश्रमशाळा चालविल्या जात आहेत. पुर्वीच्या काळी आदिवासी समाज हा अप्रगत होता त्यांच्या जीवनात दारिद्र्याशिवाय काहीही नव्हते हे जरी सत्य असले तरी, आदिवासींच्या मुलांना शिक्षण देण्यासाठी युवागृहे होती. यामधुन त्यांना जीवनोपयोगी शिक्षण मिळत असे. विलास संगवे लिहितात , "आदिवासी जमातींतील विविध युवागृहे किंवा शयनगृहे (Dormitories) यांना फार महत्वाचे स्थान आहे . तरुण स्त्री-पुरुषांनी एकत्रितपणे अगर स्वतंत्रपणे रात्रीचा वेळ व्यतीत करण्यासाठी निर्माण झालेल्या संघटना युवागृहे अगर शयनगृहे असे म्हणतात. परंतु केवळ रिकामा वेळ घालविण्यापुरते अगर मौज करण्यापुरते युवागृहांचे कार्यक्षेत्र मर्यादित राहिले नाही. सामाजिक, धार्मिक, आर्थिक, शैक्षणिक, संरक्षण विषयक आदि स्वरुपाची कामे हळुहळु युवागृहांना पत्कारावी लागली व पुढे अशी कामे पार पाडणे ही युवागृहांची जबाबदारी होऊन बसली. साहजिकच युवागृहांसारख्या उपयुक्त मंडळांना आदिवासींच्या सामाजिक जीवनात विशिष्ट मानाचे स्थान प्राप्त झाले."

युवागृहामध्ये प्रत्येकजण आपल्या आवडीनुसार शिक्षण घेत होते. सध्याच्या स्थितीमध्ये युवागृहासारख्या संस्थांचे अस्तित्व राहिलेले नाही. त्याची जागा आधुनिक शिक्षणाने घेतली आहे. आदिवासी समाजाने नागरी समुदायांचे जीवन स्विकारले आहे . बरेच आदिवासी गावात, शहरात साध्या स्थितीत राहात आहेत. त्यामुळे त्यांच्यात बदल होत आहे. भारतातील शिक्षणाचा पाया १८८२ मध्ये इंडियन एज्युकेशन कमिशनच्या स्थापनेनंतर घातला गेला. या कमिशनने आदिवासींना शिक्षण देण्याविषयी काही सुचना केल्या. १८८२-१९२० हा पहिला टप्पा मानला जातो. १९२१ नंतर दुसरा टप्पा मानला जातो. तीन प्रकारच्या शैक्षणिक संस्था या नंतर अस्तित्वात होते.

स्वातंत्र्योत्तर भारतीय घटनेने शिक्षणाचे महत्त्व ओळखुन प्राथमिक शिक्षणावर भर दिला. प्राथमिक शिक्षण ही राज्याची जबाबदारी झाली. १९५५ साली मुलभुत शिक्षणाच्या मुल्यांकनासाठी एका समितीची स्थापना केली गेली. प्रत्येक गावात किमान एक शाळा उघडण्याचे ध्येय सरकारपुढे होते. आदिवासी शिक्षणासाठी आश्रमशाळा काढण्याचे उद्दिष्ट नक्की करण्यात आले. आदिवासी भागातील मुर्लीच्या शिक्षणासाठी अत्यंत दुर्गम भागातही आश्रमशाळा सुरु करण्यात आल्या. याशिवाय स्वयंसेवी संस्थांकडुनअशी शाळा चालविण्यास मान्यता असल्याने अशा शाळांचा आणि पर्यायाने शिक्षणाचा प्रसार सुरु झाला. आश्रमशाळांच्या बरोबरीने आदिवासी मुले आणि मुलींसाठी मुंबई, पुणे, नागपुर, अमरावती अशा विविध शहरांतुन सरकारी वसतीगृहे उघडण्यात आली, त्यामुळे त्यांना उच्च शिक्षण व व्यावसायिक शिक्षण घेण्यास पर्याय प्राप्त झाले.


ASSISTANT PROFESSOR

घरात आणि आजुबाजुला शिक्षणासाठी पोषक असे वातावरण आदिवासींमध्ये नसल्याने प्रसिद्ध सामाजिक कार्यकर्ते के. ठक्कर बाप्पा यांनी आदिवासींना मोफत भोजन व निवासासह, त्यांच्यामध्ये शिक्षणाचा प्रसार व्हावा म्हणुन आश्रमशाळेची संकल्पना मांडली. प्राचीन गुरुकुल पद्धतीवर आधारीत अशी ही पद्धती होती, अजुन या पद्धतीत शिक्षक - विद्यार्थी यांच्या एकत्र राहण्याने संपर्क वाढतो. १९२२ मध्ये गुजरातमधील भील्लांच्या मीराखेडी या गावात पहिली आश्रमशाळा सुरु झाली.

"पहिल्या व दुसऱ्या वर्गात प्रवेश घेऊन शाळेत येणे म्हणजे शैक्षणिक क्षेत्रातील यशाचा निकष ठरत नाही. कारण शाळेत प्रवेश घेतल्यानंतरही नियमित येऊन परीक्षा देऊन पुढील वर्गात जाणे म्हणजेच किमान प्राथमिक, माध्यमिक स्तरा पर्यंत शिकत जाणे, हेच खरे शिक्षण व्यवस्थेचे यश आहे. महाराष्ट्रातील आदिवासी मुलींची ६.७९ टक्के तर मुलांची ५.१२ टक्के इतकी इयत्ता दहावी पर्यंत शालेय गळती झाल्याची नोंद आहे. हे आकडे जरी मागील दशकातील असले, तरी परिस्थिती खुपच सुधारली आहे,असे म्हणता येणार नाही. " आदिवासी भागातील शिक्षणाच्या परिस्थितीसाठी जी कारणक सांगितली जातात. त्यानुसार सामाजिक, आर्थिक घटकच जबाबदार आहेत असे जाणवते. याबाबत एल्विन यांनी सुद्धा असे म्हटले आहे की, एखादा मुलगा किंवा मुलगी शाळेत पाठविणे हा आदिवासी कुटुंबासाठी एक मोठा असा आर्थिक स्वरुपाचा निर्णय असतो. श्रमविभागणीद्वारे कुटुंबासाठी तो मुलगा अथवा मुलगी प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षपणे कुटुंबाचा आर्थिक भार पेलत असतो. शौनक कुलकर्णी म्हणतात की, "या मुलांच्या शाळेत जाण्याने कुटुंबाला दैनंदिन जीवनात आर्थिक प्रश्नांना तोंड द्यावे लागते आणि याच मुख्य कारणाने मुलांची शालेय गळती होते आणि पर्यायाने आदिवासींची शैक्षणिक प्रगती धीम्या गतीने होतांना दिसते ." "आदिवासींमध्ये असलेली निरक्षरता लक्षात घेवुन शासन विविध स्तरांवर शैक्षणिक योजना राबवित आहे. अतिदुर्गम व डोंगराळ भागात राहणाऱ्या अनुसुचित जमातीच्या लोकांच्या आर्थिक, शैक्षणिक व सामाजिक विकास जलद गतीने घडवुन आणण्यासाठी सन १९७२ - ७३ पासुन शासनाने निवासी आश्रमशाळा समुह योजना कार्यान्वित केलेली आहे. "

आदिवासी मुलींच्या गळतीचे प्रमाण रोखण्यासाठी शासनाकडुन आदिवासी विद्यार्थ्यांना उपस्थिती भत्ता दिल्या जातो. महाराष्ट्राच्या आर्थिक पाहणीनुसार "या योजनेमध्ये आदिवासी उपाययोजना क्षेत्रातील सर्व मुली व आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेरील अता, अज आणि दारिद्रय रेषेखालील कुटुंबातील मुलींचा समावेश असतो. सन २०१३-१४ मध्ये रु. १०.८१ कोटी खर्च झाला व लाभार्थी मुलींची संख्या सुमारे ४.९१ लाख होती."

शासनाच्या योजनेमुळे व आदिवासींमध्ये जी शैक्षणिक आवड निर्माण झाली त्यामुळे आज त्यांच्यात शैक्षणिक बदल नक्कीच होत आहेत. आज आदिवासींमध्ये शिक्षणाचे प्रमाण इतर कोणत्याही समाजा पेक्षा अथवा शहरी - ग्रामिण भागापेक्षा कमी आहे. शैक्षणिक गळतीचेही प्रमाण इतरांपेक्षा आदिवासी समाजात जास्त आहे. आणि त्यातही आदिवासी मुलींमध्ये ते सर्वाधिक आहे. हे वास्तविकता आहे. परंतु आदिवासींच्या शैक्षणिक प्रगतीसाठी शासन स्तरावर प्रयत्न चालु आहेत. तसेच सामाजिक स्तरावरही अपेक्षित आहे. त्यासाठी आदिवासींमध्ये शैक्षणिक जाणीव निर्माण करुन देणे ही समाजाची नैतिक जबाबदारी आहे.

## संदर्भ सुची :-

१. विलास संगवे (१९००) : आदिवासी समाजाचे शिक्षण , पॉप्युलर प्रकाशन , मुंबई, पृ. १६२
२. शौनक कुलकर्णी (२००५) : महाराष्ट्रातील आदिवासी, डायमंड पब्लिकेशन, पुणे, पृ. ९०
३. कित्ता , पृ. ९२
४. आदिवासी विकास विवभाग, माहिती पुस्तिका, (सन २०११-१२), महाराष्ट्र शासन, पृ. १३
५. कित्ता (२००९) पृ. ९१
६. महाराष्ट्राची आर्थिक पाहणी (२०१४-१५), अर्थ व सांख्यिकी संचालनालय, नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, पृ. १४९

ASSISTANT PROFESSOR
DEPT. OF Phy. Edu.
SHIVNERI MAHAVIDYALAYA, SHIRUR (A.)

